**बाब क्रमांक : २७३/१**

**विषय :- महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या दिनांक ११.०७.२०१७ रोजी झालेल्या २७२ व्या बैठकीचे प्रारुप कार्यवृत्त स्थायी करण्याबाबत.**

---

उक्त विषय सचिव/प्राधिकरण यांनी सभागृहापुढे सादर केला.

सन्माननीय सदस्यानी बैठकीच्या प्रारुप कार्यवृत्तांतात दुरुस्ती न सुचविल्याने सदर कार्यवृत्त एकमताने स्थायी करण्यात आले.

**बाब क्रमांक : २७३/२**

**विषय :- मुं.इ.दु.व पु.मंडळांतर्गत जुन्या उपकर प्राप्त इमारतींच्या पुर्नरचित /पुनर्विकासातून प्राप्त झालेले अतिरीक्त गाळे मुंबई मंडळाकडे विक्रीसाठी वर्ग करणेबाबत व विकास नियंत्रण नियमावली ५८(७) (ii) (ब) अंतर्गत श्रीनिवास मिल चाळ, लोअर परेल येथे प्राप्त होणाऱ्या ३६ सदनिकांच्या विक्री किंमतीबाबत.**

---

उक्त विषय सचिव/प्राधिकरण यांनी सभागृहापुढे सादर केला.

सचिव / प्रा. यांनी सदर बाब टिपणी चक्राकारपध्दतीने मंजूर करण्यात आली असून **क्र.६७५६** अन्वये ठराव करण्यात आला असल्याचे सभागृहाच्या निदर्शनास आणून सदर बाब सन्माननीय सदस्यांच्या माहितीकरिता सादर करण्यात आली.

**बाब क्रमांक : २७३/३**

**विषय :- महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचा सन २०१६-१७ या वित्तीय वर्षाचा वार्षिक लेखा प्राधिकरणाने स्विकृत करणेबाबत व लेखा परिक्षणास सादर करणेबाबत**

---

उक्त विषय सचिव/प्राधिकरण यांनी सभागृहापुढे सादर केला.

सचिव / प्रा. यांनी सदर बाब टिपणी चक्राकारपध्दतीने मंजूर करण्यात आली असून **क्र.६७५७** अन्वये ठराव करण्यात आला असल्याचे सभागृहाच्या निदर्शनास आणून सदर बाब सन्माननीय सदस्यांच्या माहितीकरिता सादर करण्यात आली.

**बाब क्रमांक : २७३/४**

**विषय :- म्हाडा कर्मचाऱ्यांसाठी सन २०१७ या करीता सानुग्रह अनुदान मंजुर करणेबाबत.**

**-----------------------------------------------------**

**ठराव क्रमांक : ६७५८** **दिनांक : १२/१०/२०१७**

प्राधिकरणाने एकमताने निर्णय घेतला की, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाकडील अधिकारी / कर्मचारी तसेच म्हाडात प्रतिनियुक्तीने असलेल्या अधिकारी / कर्मचा-यांना सन २०१६-१७ या वित्तीय वर्षात किमान ६ महिने काम केलेल्या अधिकारी / कर्मचारी यांना प्रत्येकी रु. १४,०००/- इतकी रक्कम सानुग्रह अनुदान म्हणून अदा करण्यास प्राधिकरण मान्यता देत आहे.

सदर ठराव कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता अंमलबजावणी करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**बाब क्रमांक : २७३/५**

**विषय :- नागपुर मंडळाच्या ख.क्र.२१/२ मौजा डवलामोटी नागपुर येथील भूखंडधारकांच्या समस्याबाबत.**

**-----------------------------------------------------**

**ठराव क्रमांक : ६७५९** **दिनांक : १२/१०/२०१७**

प्राधिकरणाने एकमताने निर्णय घेतला की, नागपूर येथील क्र.२१/२ मौजा डवलामेटी येथील १२० भूखंडधारकांना भूखंडा ऐवजी ६१.५१ चौ.मी. बांधकाम क्षेत्रफळाच्या बहुमजली इमारतीमध्ये सदनिका

बांधकाम किंमतीत ( Construction Cost ) देण्यात यावी (जमीनीची किंमत वगळून) तसेच उर्वरित सदनिका म्हाडाच्या प्रचलित विक्रिकिंमत विषयक धोरणानुसार आकारुन विक्री करण्यास तसेच सदर योजना पंतप्रधान अनुदान प्रकल्पांतर्गत राबविण्यास मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता अंमलबजावणी करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**बाब क्रमांक : २७३/७**

**विषय :- धुळे येथील स.क्र.४७१,४७७,४७८ चाळीसगांव रोड मधील पश्चिम हुडको मध्ये अभिन्यासातच नकाशात डी मधील सुविधा भूखंडावरील ८०० चौ.मी जागा नवनिर्मित चाळीसगांव रोड पोलीस स्टेशनसाठी देणेबाबत.**

---

**ठराव क्रमांक : ६७६०** **दिनांक : १२/१०/२०१७**

प्राधिकरणाने एकमताने निर्णय घेतला की, धुळे येथील स.क्र. ४७१, ४७७, ४७८ हि जमिन कलम ४१ अंतर्गत सन १९८२ मध्ये संपादित केलेल्या जमिनीवरील मंजूर अभिन्यासातील सुविधा भुखंडापैकी महामार्ग क्र. २११ व ३० मी.डी.पी.रस्त्या लगत असलेली ९४६ चौ.मी. असलेला भूखंड नवनिर्मीत चाळीसगांव पोलीस स्टेशनसाठी म्हाडाच्या प्रचलित धोरणानुसार म्हणजे व्यापारी भुखंडासाठी म्हणजेच Amrnity Plot साठी समतल किंमत म्हणजेच रेडीरेकनरचा दर आकारुन (offset price ) विना निविदा पध्दतीने भूखंड विक्री करण्याच्या प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठरावाची अमंलबजावणी इतिवृत्त व स्थायीकरणाची वाट न पहाता तात्काळ करण्यांस मान्यता देण्यात येत आहे..

**बाब क्रमांक : २७३/८**

**विषय :- आडगांव गट क्र.६०९, गट क्र.२१७/४-अ म्हसरुळ, गट क्र.४४८/५/६ मखमलाबाद, गट क्र.४३/२-ब+४३/२-ब/१-अ/२ पंचक ता.जि.नाशिक व श्रीरामपूर जि. अहमदनगर येथील टप्पा क्र.१ योजनेतील सदनिकांच्या विक्री किंमतीतील व्याजाचे भांडवलीकरण गोठविण्याबाबत.**

---

**ठराव क्रमांक : ६७६१** **दिनांक : १२/१०/२०१७**

प्राधिकरणाने एकमताने निर्णय घेतला की, नाशिक गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळांतर्गत आडगांव गट क्र.६०९, गट क्र.२१७/४-अ म्हसरुळ, गट क्र.४४८/५/६ मखमलाबाद, गट क्र.४३/२-ब+४३/२-ब/१-अ/२ पंचक ता.जि.नाशिक व श्रीरामपूर जि. अहमदनगर येथील टप्पा क्र.१ योजनेतील सदनिकांच्या विक्री किंमतीतील व्याजाचे भांडवलीकरण गोठविण्याबाबत सादर करण्यात आलेल्या खालील प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

| **Sr. No.** | **Name of Scheme** | **Category** | **No.of Tenements** | **Tentative Sale Price cost of per T/s in Rs. (interest Capitalised up to Dec-2015 for Nashik Project & Dec-2016 for Shrirampur Project)** | **Tentative Sale Price cost of per T/s in Rs. (interest Capitalised up to Dec-2017)** | **Probable Loss in intrest for vacant tenements to be sold out after freezing of intrest Amt. in Rs.** |
|---|---|---|---|---|---|---|
| **1** | **2** | **3** | **4** | **5** | **6** | **7** |
| 1 | Construction of 56 T/s MIG on Gut No.217/4A at Mhasrul, Nashik | MIG | 42 T/s | 26,95,000/- | 27,76,000/- | 34,02,000/- |
| | | MIG | 14 T/s | 19,60,000/- | 20,18,500/- | 8,19,000/- |
| 2 | Construction of 112T/s MIG on Gut No.448/5+6 at Makhamalabad, | MIG | 112 T/s | 26,27,500/- | 27,95,500/- | 1,88,16,000/- |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | Nashik | | | | | |
| 3 | Construction of 192T/s EWS, 112T/s LIG, 112T/s MIG on Gut No.609 at Adgaon, Nashik | EWS | 192T/s | 10,24,388/- | 11,41,900/- | 2,25,62,304/- |
| | | LIG | 112T/s | 17,33,329/- | 19,32,100/- | 2,22,62,352/- |
| | | MIG | 112T/s | 24,52,074/- | 26,20,800/- | 1,88,97,312/- |
| 4 | Construction of 140 T/s LIG on Land S.No.43/2B/2 at Panchak, Nashik | LIG | 140 T/s | 24,98,000/- | 27,64,500/- | 3,73,10,000/- |
| 5 | Construction of 4T/s EWS, 170T/s LIG, 78 T/s MIG &37 Shops under Phase-I on Land bearing S.No. 52/150, 52/151, 52/152, 54/1, 63,63/1,63/2, 64/1, 65/1 at Shrirampur Dist. Ahmednagar. | EWS | 4 T/s | 7,82,350/- | 8,36,400/- | 2,16,200/- |
| | | LIG | 168 T/s | 10,26,100/- | 11,42,100/- | 1,94,88,000/- |
| | **TOTAL** | | | | | 14,37,73,168/- |

सदर ठरावाची अमंलबजावणी इतिवृत्त व स्थायीकरणाची वाट न पहाता तात्काळ करण्यांस मान्यता देण्यात येत आहे..

**बाब क्रमांक : २७३/९**

**विषय :- आयकर अपिलीय अधिकरण यांचेसमोर वित्तीय वर्ष २००९-१० करीता दाखल केलेल्या याचिकेप्रकरणी विधीतज्ञ व सनदी लेखापाल यांची देयके अदा करणेबाबत.**

---------------------------------------------------

**ठराव क्रमांक : ६७६२** **दिनांक : १२/१०/२०१७**

प्राधिकरणाने एकमताने निर्णय घेतला की, मा.आयकर अपिलीय अधिकरण यांचेसमोर दाखल केलेल्या याचिका क्र. ITA/६६७८/Mum/२०१३ प्रकरणी व्यावसायिक शुल्क म्हणून ज्येष्ठ विधीतज्ञ श्री.एस.इ.दस्तूर यांची विधीज्ञ फी रू.३,६१,०१,२५०/- ( रू.तीन कोटी एकसष्ट लाख एक हजार दोनशे

पन्नास फक्त ), मे.मिन्ट ॲण्ड कॉन्फ्रेरेस (ॲड.निशांत ठक्कर) यांची फी रू.७६,६९,०००/- (रू.शहात्तर लाख एकोणसत्तर हजार फक्त) व मे.के.एस.संघवी ॲण्ड कं. यांची फी रू.१,७२,५०,०००/- (एक कोटी बहात्तर लाख पन्नास हजार फक्त) असे एकूण रू.६,१०,२०,२५०/-(रू.सहा कोटी दहा लाख वीस हजार दोनशे पन्नास फक्त) इतक्या रकमेची देयके अदा करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठरावाची अमंलबजावणी इतिवृत्त व स्थायीकरणाची वाट न पहाता तात्काळ करण्यांस मान्यता देण्यात येत आहे..

**बाब क्रमांक : २७३/१०**

**विषय :- महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळास नागपूर-मुंबई कम्युनिकेशन एक्सप्रेसवेसाठी कर्जस्वरूपात / ठेवीस्वरूपात रू. १०००/- कोटी अर्थसहाय्य उपलब्ध करून दिल्याबाबत.**

---

**ठराव क्रमांक : ६७६३** **दिनांक : १२/१०/२०१७**

प्राधिकरणाने एकमताने निर्णय घेतला की, प्राधिकरण ठराव क्र. ६७४३ दिनांक ०१/०६/२०१७ अन्वये महाराष्ट्र गृहनिर्माण क्षेत्रविकास प्राधिकरण व महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ यांच्यामध्ये दिनांक ०५/०७/२०१७ रोजी झालेल्या करारनाम्यातील अटी व शर्तीच्या अधिन राहून महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ यांना कर्ज / ठेव स्वरूपात उपलब्ध करून दिलेले रू. १०००/- कोटी रकमेवरील व्याजाची परिगणना यामध्ये कोणताही बदल स्विकारहार्य नाही. महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ यांनी दिनांक २९/०९/२०१७ रोजीच्या पत्रान्वये, दिनांक ०५/०७/२०१७ रोजी महाराष्ट्र गृहनिर्माण क्षेत्रविकास प्राधिकरण व महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ यामध्ये झालेल्या करारनाम्यातील अटी व शर्ती यामध्ये सुधारणा करण्याबाबत केलेली विनंती अमान्य करण्यात येत असून मूळ करारनाम्यातील अटी व शर्तीप्रमाणे व्याज व मुददल रक्कमेबाबत कार्यवाही व्हावी यास प्राधिकरण मान्यता देत आहे.

सदर ठरावाची अमंलबजावणी इतिवृत्त व स्थायीकरणाची वाट न पहाता तात्काळ करण्यांस मान्यता देण्यात येत आहे..

**बाब क्रमांक : २७३/१२**

**विषय :- नविन चंद्रपुर विकास योजना सुधारीत करण्याबाबतचा इरादा जाहीर करण्याबाबत व ADTP ची नियुक्ती करण्याबाबत.**

---

**ठराव क्रमांक : ६७६४** **दिनांक : १२/१०/२०१७**

प्राधिकरणाने एकमताने निर्णय घेतला की, नविन चंद्रपुर विकास योजना दि. ३०/०६/१९९८ ला मंजुर झाली असून दि. १/०९/१९९८ पासून अंमलात आली आहे व अंमलात आल्याच्या दिनांकापासून २० वर्षांकरीता वैध आहे. तसेच म.प्रा.व.न.र. अधिनियम १९६६ चे कलम ३८ नुसार २० वर्षांनंतर सुधारीत विकास योजना तयार करणे आवश्यक असल्याने उक्त अधिनियमाचे कलम २३ अन्वये नविन चंद्रपुर मंजुर विकास योजना सुधारीत करण्याबाबतचा इरादा (Declaration of intention) जाहीर करण्यास्तव तसेच म.प्रा.व.न.र. अधिनियम १९६६ चे कलम २४ अन्वये सहाय्यक संचालक नगररचना अधिकाऱ्याची नियुक्ती करुन कलम ३२ नुसार सुधारित विकास योजना तयार करण्यास प्राधिकरण मान्यता देत आहे.

सदर ठरावाची अमंलबजावणी इतिवृत्त व स्थायीकरणाची वाट न पहाता तात्काळ करण्यांस मान्यता देण्यात येत आहे..

**बाब क्रमांक : २७३/१३**

**विषय :- महाराष्ट्र गृहनिर्मान व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या दि.२९/०३/२०१७ रोजी झालेल्या २७० व्या बैठकीमधील बाब क्र.२७०/४ नुसार करण्यात आलेला ठराव क्र.६७३३ मध्ये सुधारणा करणेबाबत.**

---

**ठराव क्रमांक : ६७६५** **दिनांक : १२/१०/२०१७**

प्राधिकरणाने एकमताने निर्णय घेतला की, नविन चंद्रपूर मौजा कोसारा, स.नं. १५१, १५२,१५४ एकूण आराजी ११.३९ हे.आर. तसेच स.क्र. १४७(भाग), १४८(भाग), १५०(भाग), १५७(भाग) असे एकूण अंदाजे क्षेत्र १७.०० हे.आर. या जमिन जागेवरील आरक्षण बदलाबाबत.) महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास

प्राधिकरणाच्या दि. २९/०३/२०१७ रोजी झालेल्या २७० व्या बैठकीमधील बाब क्र. २७०/४ नुसार करण्यात आलेला ठराव क्र. ६७३३ मध्ये १४८ (भाग) या क्षेत्राचा समावेश अनावधानाने करण्यात आलेला नव्हता तरी ठराव क्र.६७३३ दिनांक २९/०३/२०१७ मध्ये १४८ ( भाग ) या क्षेत्राचा समावेश करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता पुढील अंमलबजावणी करण्यास मान्यता देण्यात आली होती.

**बाब क्रमांक : २७३/१४**

**विषय :- ठराव क्र.६०७१, दि.२१/०८/२००४ च्या निर्णयाने ओशिवरा येथील सर्व्हे क्र.४१ (भाग) मधील करमणुकीचा (R.G.) मैदानाकरीता आरक्षित असलेल्या ३,७५०-०० चौ.मी. भूखंडापैकी मरकुझल मारीफ एज्युकेशन अँड रिसर्च सेंटर यांना वितरीत केलेल्या १,२५०-०० चौ.मी. भूखंडाचे वितरण तसेच ठराव क्र.६०७१ रद्य करणेबाबत**

---------------------------------------------------

**ठराव क्रमांक : ६७६६** **दिनांक : १२/१०/२०१७**

प्राधिकरणाने एकमताने निर्णय घेतला की, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळांतर्गत ओशिवरा येथील माध्यमिक शाळा व प्राथमिक शाळा या करीता विकास आरखड्यातील आरक्षित असलेल्या भूखंडालगतच्या करमणुकीचा (R.G.) मैदानाकरीता आरक्षित असलेला भूखंड १/३:२/३ या प्रमाणात विभाजन करून दोन संस्थांमध्ये वितरीत करण्यास काही अटी व शर्तीवर मान्यता देण्यात आली होती. सदर जमिन ही म्हाडाच्या मालकीची आहे, असे गृहित धरून असा ठराव पारित करण्यात आला होता व त्यानुसार १,२५०.०० चौ.मी. बांधकाम नियमित करावे असा ठराव झाला आहे. परंतु सदर भूखंड महानगरपालिकेस सन-१९८१ मध्ये म्हाडा प्राधिकरणाने हस्तांतरीत केला होता. ठराव पारित करतेवेळी सदर भूखंड महानगरपालिकेच्या ताब्यात असल्यामुळे म्हाडातर्फे मरकाझुल मारीफ एज्युकेशन अँड रिसर्च सेंटर यांना ठराव क्र.६०७१, दि.२१/०८/२००४ अन्वये वितरीत केलेला भूखंड रद्दबादल करणेस मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठरावाची अमंलबजावणी इतिवृत्त व स्थायीकरणाची वाट न पहाता तात्काळ करण्यांस मान्यता देण्यात येत आहे.

**बाब क्रमांक : २७३/१५**

**विषय :- महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणांतर्गत मुंबई मंडळ व इतर विभागीय मंडळातील सदनिकांच्या विक्री किंमतीच्या थकीत रकमेवर आकारण्यात येणाऱ्या व्याजाचा दर कमी करणेबाबत**

---

**ठराव क्रमांक : ६७६७** **दिनांक : १२/१०/२०१७**

प्राधिकरणाने एकमताने निर्णय घेतला की, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणांतर्गत मुंबई मंडळ व इतर विभागीय मंडळातील सदनिकांच्या विक्री किंमतीच्या थकीत रकमेवर आकारण्यात येणाऱ्या व्याजाचा दर कमी करणेबाबत खालीलप्रमाणे मान्यता देण्यात येत आहे.

१. सद्यस्थितीतील राष्ट्रीयकृत, खाजगी, सहकारी बँका तसेच इतर वित्तिय संस्थांच्या सन २०१६-१७ सालातील व्याजदराचा तुलनात्मक आढावा घेतला असता, खाजगी बँक क्षेत्रात कार्यरत **ड्युष बँक या बँकेचा व्याजदर द.सा.द.शे. ११% असून सदर व्याजदर सद्यस्थितीतील गृहकर्जासाठी बँकांकडून आकारण्यात येणारा सर्वात जास्त व्याजदर असल्याचे दिसून येते.** संदर्भिय ठरावात निश्चित करण्यात आल्यानुसार व्याजदरात सुधारणा प्रस्तावित करण्याच्या वेळेस विविध बँका / वित्तिय संस्था यांच्या व्याजदराच्या आकारणीचा आढावा घेऊन अधिकतम असलेला व्याजदर लाभार्थ्यास आकारण्यात यावा, असे नमूद असल्याने संदर्भिय ठरावात निश्चित करण्यात आलेल्या व्याजदरात सुधारणा करुन लाभार्थ्यास सदनिका शुल्क विलंबाने भरणा केल्यास त्यावरील व्याजदर ११% आकारण्याचे प्रस्तावित आहे.

२. वित्तिय संस्थांच्या व्याजदरात सातत्याने बदल होत असल्याने, त्या तुलनेत लाभार्थ्यांस आकारावयाच्या सुधारित व्याजदराबाबत त्याकालानुरुप, राष्ट्रीयकृत, खाजगी, सहकारी बँका तसेच इतर वित्तिय संस्थांच्या असणा-या व्याजदराचा तुलनात्मक आढाव्यानुसार मंडळातील सदनिकांच्या विक्री किंमतीच्या थकीत रकमेवर आकारण्यात येणा-या व्याजाचा दर निश्चित करण्याकरीता प्रत्येक आर्थिक वर्षनिहाय माहे एप्रिलमध्ये प्राधिकरण स्तरावर प्रस्ताव सादर करण्यात यावा.

३. लाभार्थ्यांस आकारावयाच्या सुधारित व्याजदराच्या बाबीस प्राधिकरणाची मान्यता प्राप्त झाल्यास, सुधारित व्याजदर आकारणीच्या अंमलबजावणीकरीता सदर बाब टिप्पणीनुसार सादर करण्यात येणा-या

ठरावास मान्यता प्राप्त झाल्यास, सदर ठरावाची अंमलबजावणी पूर्वलक्षी प्रभावाने न करता ठराव संमत झाल्याच्या दिनांकापासून पुढे ११% द.सा.द.शे. दराने तथा त्यापूर्वीच्या कालावधीकरीता ठराव क्र. ५७३७ नुसार १३.५% दराने द.सा.द.शे. दराने व्याज आकारणी करण्यात यावी.

सदर ठरावाची अमंलबजावणी इतिवृत्त व स्थायीकरणाची वाट न पहाता तात्काळ करण्यांस मान्यता देण्यात येत आहे.

**बाब क्रमांक : २७३/१६**

**विषय :- मुंबई मंडळाच्या विविध वसाहतीतील मोकळ्या भुखंडावर टर्न-की अंतर्गत राबविण्यात आलेल्या गृहनिर्माण योजनांच्या कंत्राटदारांना भाववाढ (Price Escalation) देणेबाबत.**

---

**ठराव क्रमांक : ६७६८** **दिनांक : १२/१०/२०१७**

प्राधिकरणाने एकमताने निर्णय घेतला की, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या विविध वसाहतीतील मोकळ्या भुखंडावर टर्न-की अंतर्गत राबविण्यात आलेल्या गृहनिर्माण योजनांच्या कंत्राटदारांना भाववाढ (Price Escalation) देणेबाबत मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशास अनुसरुन गठित करण्यात आलेल्या समितीने सर्वानुमते " The committe unanimously rejected the grant of Price Variation / Escalation to the petitioners for giving relief to the contractor of Turn Key Project "C" type contracts of Mumbai Board. " [ समितीने याचिकाकर्त्यांना भाववाढ (Price Escalation) देऊन, टर्न-की ('सी' कंत्राट) गृहनिर्माण योजनेतील ठेकेदाराना दिलासा (relief) देण्याचा मुद्दा सर्वानुमते नाकारण्याचा निर्णय घेतला. ] यास प्राधिकरण मान्यता देत आहे.

सदर ठरावाची अमंलबजावणी इतिवृत्त व स्थायीकरणाची वाट न पहाता तात्काळ करण्यांस मान्यता देण्यात येत आहे.

**बाब क्रमांक : २७३/२१**

**विषय :- मुंबई इमारत दुरुस्ती पुनर्रचना मंडळांतर्गत जुन्या उपकरप्राप्त इमारतीची पुनर्रचना/पुनर्विकासामधुन प्राप्त झालेल्या ३०० चौ.फुट क्षेत्रफळापेक्षा कमी आकारमानाचे गाळे संक्रमण गाळे म्हणुन वापरण्यास परवानगी देणेबाब्त.**

---

**ठराव क्रमांक : ६७६९** **दिनांक : १२/१०/२०१७**

प्राधिकरणाने एकमताने निर्णय घेतला की, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळांतर्गत शासनाच्या दिनांक २१/०५/२०११ रोजीच्या विकास नियंत्रण नियमावली क्र. ३३ (७) च्या धोरणांनुसार यापुढे प्रत्येक पात्र रहिवाशांस पुनर्वसन गाळे हे ३०० चौरस फुट चटई क्षेत्रफळाचे अनुज्ञेय आहेत त्यामुळे यापुढे ३०० चौरस फुट अथवा ३०० चौरस फुट चटईक्षेत्रफळापेक्षा कमी क्षेत्रफळ असलेले गाळे रहिवाशी घेण्यास तयार नसल्याने व मागणी नसल्याने सद्यस्थितीत मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाकडे ३०० चौरस फटापर्यंत व त्यापेक्षा कमी चटई क्षेत्रफळापेक्षा कमी आकारमानाचे पुनर्रचीत / पुनर्विकसित रिक्त असलेले १०२ निवासी गाळे हे " संक्रमण गाळे " म्हणून वापर करण्यास प्राधिकरण मान्यता देत आहे.

सदर ठरावाची अमंलबजावणी इतिवृत्त व स्थायीकरणाची वाट न पहाता तात्काळ करण्यांस मान्यता देण्यात येत आहे.

**बाब क्रमांक : २७३/२२**

**विषय :- मुंबई येथील बैठकीकरीता उपस्थित राहणाऱ्या भाप्रसे अधिकाऱ्यांची राज्य शासनाच्या अधिनस्त महामंडळ /सार्वजनिक उपक्रमाच्या विश्रामगृहात निवास व्यवस्था करण्याबाबत.**

---

**ठराव क्रमांक : ६७७०** **दिनांक : १२/१०/२०१७**

प्राधिकरणाने एकमताने निर्णय घेतला की, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळांतर्गत मुंबई येथील बैठकी करीता उपस्थित राहणा-या भाप्रसे अधिका-यांची राज्य शासनाच्या अधिनस्त महामंडळ/सार्वजनिक उपक्रमाच्या विश्रामगृहात निवास व्यवस्था करण्याबाबत पुनर्विकसीत इमारत सी.एस.क्र.३८६, ताडदेव विभाग वेलिंग्टन व्हयु येथील सहा (०६) गाळे व पुनर्विकसीत इमारत सी.एस.क्र.५४३, माटुंगा डिव्हीजन इमारत क्र.१५ए, वसंतराज लेन,माटुंगा वास्तु येथील आठ(०८) असे एकूण १४ गाळे वर्ग करण्यास व त्या करीता सदर गाळयांचा सुशोभीकरण व देखभालीसाठी एकूण १४ गाळयांमध्ये विश्रामगृह बनविण्यासाठी सिव्हील काम,सुतार काम,इलेक्ट्रीकल काम,फर्निचर कामाकरीता अंदाजित प्रति गाळा रु.२६,०३,४२०/- ऐवढी असुन एकूण १४ गाळयांकरीता १४ = २६,०३,४२०/ = ३,६४,४७,८८०/- एवढया खर्चास तसेच दोन परिचर (Attendant) यांचा खर्च अंदाजे वार्षीक रु.३,८९,५२०/- ऐवढा आहे. तसेच Cook with Utensils प्रति दोन यांचा खर्च अंदाजे वार्षीक रु.४,२९,४८०/- ऐवढा आहे. House Keeping Services with materials प्रति दोन व्यक्ती यांचा खर्च अंदाजे वार्षीक रु.४,२५,५२०/- ऐवढा असुन एकूण सहा व्यक्तींकरीता इतर सर्व कर भरुन एकूण रु. १४,६८,५३४/- एवढया खर्चास मान्यता देण्यात येत आहे.

तसेच रितसर निवीदा प्रक्रियेव्दारे सदर १४ गाळयांचे सुशोभीकरण व देखभालीसाठी कंत्राटदार नेमण्याची कार्यवाही करण्यास व सदर विश्रामगृहाचे नियोजन व प्रशासकीय नियंत्रण मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ या विभागामार्फत करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठरावाची अमंलबजावणी इतिवृत्त व स्थायीकरणाची वाट न पहाता तात्काळ करण्यांस मान्यता देण्यात येत आहे.